MHRG090004962024

## नि. क्र. ०५ खालील आदेश.

अर्जदार क्र.१ हिने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ (यापुढे सोयीकरीता व संक्षिप्तरित्या 'अधिनियम' असे संबोधण्यात आले आहे) कलम २३ अन्वये प्रस्तुत अर्ज सामनेवाला क्र. १ याच्याकडून तिच्या व तिच्या तीन मुली अर्जदार क्र.२ ते ५ यांच्याकरिता दरमहा र. रू.३५,०००/- तात्पुरती पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. तिने प्रस्तुत अर्जात संरक्षण आदेश, निवासी आदेश तसेच अर्जदार क्र.२ ते ५ यांच्या कायमस्वरुपी ताब्याची देखील मागणी केली आहे. सदर अर्जाच्या पुष्ठ्यर्थ अर्जदार क्र.१ हिने तिचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.३ वर दाखल केले आहे.

२. अर्जदार क्र.१ हिने अधिनियमाच्या कलम १२ प्रमाणे मुळ अर्ज कलम १८, १९, २०, २१, २२ अन्वये संरक्षण आदेश, निवासी आदेश, आर्थिक सहाय्य, नुकसान भरपाईचे आदेश तसेच मुलींचा कायम स्वरुपी ताबा मिळण्याकरीता सामनेवाला क्र. १ ते ४ यांच्या विरूध्द दाखल केला आहे. सामनेवाला क्र. १ अर्जदार हिचा पती, सामनेवाला क्र.२ तिचा दिर तसेच सामनेवाला क्र. ३ व ४ तिच्या नणंद आहेत. अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दि. १९.०५.२०१३ रोजी मुस्लिम धर्म पध्दतीने झाला असून सदर विवाह संबंधातून त्यांना अर्जदार क्र.२ ते ४ या तीन मुली आहेत. अर्जदार क्र.१ लग्नानंतर सामनेवाला यांच्या एकत्र कुटुंबात नांदण्यास गेली. सामनेवाला क्र.१ कुवेत येथे युनाईटेड प्रेसिजन ड्रिलिंग कंपनीत नोकरीस असल्यामुळे तो दर दोन महिन्यानंतर कुवेत येथून घरी येत असे. सामनेवाला यांची अर्जदार क्र.१ हिस मुलगा व्हावा अशी अपेक्षा होती, परंतु अर्जदार क्र.१ हिस तिनही मुली झाल्यामुळे ते तिचा व मुलींचा राग करत असत.

सामनेवाला क्र.१ सामनेवाला क्र.३ ते ४ यांचे ऐकुण शुल्लक कारणावरून तिच्याशी भांडण करून तिला शिवीगाळ करत असे. तो अर्जदार क्र.१ हिस घ रातील कोणत्याही वस्तुला हात लावू देत नसे. तो तिला कामावरून टोमणे मारत असे. सामनेवाला क्र.२ देखील अर्जदार क्र.१ हिस 'तुझे बापाकडुन आणलेल्या वस्तु वापर, माझे वस्तुंना हात लावायचा नाही' असे बोलुन तिला शिवीगाळ करत असे. सामनेवाला क्र.३ व ४ देखील तिला मोलकरणिसारखी वागणुक देवुन तिला मारण्यासाठी अंगावर धावुन येत असे. सामनेवाला क्र.१ हा दोन महिन्यानंतर कामावरून घरी आल्यास अर्जदार क्र.१ ते ४ यांच्याकडे दुर्लक्ष करून त्यांच्याशी व्यवस्थित बोलत नसे, त्यांना वेळ देत नसे. तो दारूचे व्यसन करण्यासाठी मित्रांसोबत बाहेर जावुन जुगार खेळुन रात्री उशीरा घरी परत येत असे. त्याबाबत त्याला अर्जदार क्र.१ हिने विचारल्यास तो तिला शिवीगाळ करत असे. सामनेवाला क्र.१ यास मुलाची अपेक्षा असल्यामुळे तो अर्जदार क्र.१ हिला शारिरीक संबंध ठेवण्यासाठी जबरदस्ती करत असे. अर्जदार क्र.१ हिने घरातील सामान तसेच मुलींच्या शैक्षणिक खर्चासाठी पैसे मागितल्यास तो तिला माहेरहुन पैसे आणण्यास सांगत असे. सामनेवाला यांच्या त्रासामुळे अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ सोबत ऑगस्ट २०२३ पासुन तिच्या माहेरी आईवडीलांकडे राहत आहे. तिच्या माहेरची परिस्थिती हालाखीची आहे. तिची आई वयोवृध्द असुन त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातुन त्यांचा उदरनिर्वाह चालत आहे. अर्जदार क्र.१ हिचे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसुन अर्जदार क्र.२ ते ४ नगरपालिकेच्या उर्दु शाळेत शिक्षण घेत आहेत. सामनेवाला क्र.१ यास दरमहा रक्कम रूपये ६०,०००/- पगार असतानाही त्याने अर्जदार यांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केली नाही. मुळ अर्जाचा अंतिम निकाल होण्यास बराच अवधी लागणार असल्यामुळे अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला क्र.१ कडुन दरमहा रक्कम रु. ३५,०००/- अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

३. सामनेवाला क्र.१ ते ४ यांनी नि.क्र.१३ वर त्यांचे सविस्तर

म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी अर्जदारांसोबत असलेले नाते वगळता अर्जातील इतर संपुर्ण मजकूर नाकारला आहे. सामनेवाला यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी केव्हाही अर्जदार क्र.१ हिस कोणताही त्रास दिला नाही. सामनेवाला क्र.२ त्यांच्या पासुन स्वतंत्र रहातो व सामनेवाला क्र.३ व ४ विवाहीत असुन त्यांच्या सासरी रहातात, त्यांनी केव्हाही अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांच्या संसारात ढवळाढवळ केली नाही. अर्जदार क्र.२ ते ४ मौजे साई, ता. माणगाव येथे शिक्षण घेत असतानाही अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला क्र.१ याची कोणतीही परवानगी न घेता तसे त्याला कोणतीही कल्पना न देता मुलींची नावे शाळेतुन काढुन त्यांनी अष्टमी, ता. रोहा येथील नगरपालिकेच्या उर्दु शाळेमध्ये घातले आहे. सामनेवाला क्र. १ याचे अर्जदार क्र.२ ते ४ यांच्यावर प्रेम असुन त्याने त्यांच्या नावे पोस्टात खाते उघडले असुन तो सदर खात्यामध्ये रक्कम जमा करत आहे. त्याने केव्हाही अर्जदार क्र.१ हिचा मुली झाल्या म्हणुन राग केला नाही. त्याला कोणतेही व्यसन नसुन त्याने केव्हाही अर्जदार क्र.१ हिस माहेरहुन पैसे आणण्याची जबरदस्ती केली नाही. याउलट तो अर्जदार क्र.१ हिला नियमितपणे रोख व ऑनलाईनद्वारे पैसे देत असे. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिच्या प्रेमापोटी सन २०१४ साली मौजे साई, ता. माणगाव येथे गट क्र.३५, क्षेत्र ०-२७-१ हे. आर ही मिळकत तिच्या नावे विकत घेतली आहे. अर्जदार क्र.१ ऑगस्ट २०२३ पासून कोणतेही कारण नसताना स्वत:हुन माहेरी राहत आहे. ती सामनेवाला क्र.१ यास न सांगता अब्दुल्ला निजाम सोलकर याच्या रिक्षातुन अर्जदार क्र.२ ते ४ सोबत तिचे सामान घेवून तिच्या माहेरी गेली आहे. त्यानंतर सामनेवाला क्र.१ याने स्वत: नातेवाईकांमार्फत, त्याच्या समाजामार्फत व फोनद्वारे अर्जदार क्र.१ हिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता परंतु तिने कोणताही प्रतिसाद दिला नाही. अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र.१ यास मुलींना सुध्दा भेटु देत नाही. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिचा कोणताही कौटुंबिक हिंसाचार केला नाही. असे असतानाही अर्जदार क्र.१ ही सामनेवाला यांना जिवाचे बरेवाईट

करून घेवून अडकविण्याची धमकी देत आहे. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या पालणपोषणाची जबाबदारी घेतली आहे. अर्जदार क्र.१ हिने त्याच्या आर्थिक परिस्थिती विषयी चुकीची माहिती दिली आहे. तो अल्पशिक्षित असुन कुवेत येथे वाहान चालकाची नोकरी करतो व त्यापासुन त्याला दरमहा र.रू. २७ ते २८ हजार पगार मिळतो. त्यामध्ये त्याला स्वत:चा उदरनिर्वाह करायला लागत आहे. अर्जदार क्र.१ हिने खोटी कथने करून प्रस्तुत अर्ज दाखल केल्यामुळे त्याने प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जदारांतर्फे विधीज्ञ श्रीमती एस. सी. चव्हाण तसेच सामनेवालांतर्फे विधिज्ञ श्री. जे. एन. संगे यांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही पक्षाच्या कथनांवरुन खालील मुद्दे उपस्थित होतात त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला यांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी सिध्द केले आहे काय? | होय. |
| २) | अर्जदार क्र.१ ही अर्जात मागणी केल्याप्रमाणे तात्पुरते आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशत: होय. तिच्याकरिता दरमहा र.रु. ३,०००/- व अर्जदार क्र.२ ते ४ करिता दरमहा प्रत्येकी र.रू. १०००/- |
| ३) | अर्जदार क्र.१ ही अर्जात मागितलेल्या इतर मागण्या मंजुर होवून मिळण्यास पात्र आहे काय ? | नाही. |
| ४) | आदेश काय ? | अर्ज अंशत: मंजुर करण्यात येत आहे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.१ करीता :-**

५. अर्जदार क्र.१ हिने मुळ अर्जामध्ये विस्तृतरित्या सामनेवाला यांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार केल्याबाबत कथन केले आहे. अर्जदार क्र.१ हिने प्रस्तुत अर्जासोबत तिचे शपथपत्र देखील दाखल केले आहे. तिने तिचे मालमत्ता व दायित्व प्रकटीकरण शपथपत्र नि.क्र.६ वर दाखल केले आहे. याउलट सामनेवाला क्र. १ यांनी देखील नि.क्र.१३ वर त्यांचे सविस्तर म्हणणे दाखल करुन अर्जदार क्र.१ हिच्या वर्तणुकीविषयी आरोप केले आहेत. सामनेवाला क्र.१ याने त्याचे मालमत्ता व दायित्व प्रकटीकरण शपथपत्र नि. क्र.१५ वर दाखल केले आहे. दोन्ही पक्षांनी त्यांच्या कथनांना पुष्टी देण्याकरीता संपुर्ण पुरावा दाखल केला नसल्यामुळे सद्यस्थितीत त्या दोघांपैकी कोणाची कथने जास्त संयुक्तिक आहेत ते पाहणे आवश्यक आहे.

६. अर्जदार क्र.१ हिने तिला तिन्ही मुली झाल्यामुळे सामनेवाला क्र. १ तिचा राग करत असे, तो तिच्या व मुलींच्या पालणपोषणाकरिता पैसे देत नसे, तिला गलिच्छ भाषेत शिवीगाळ करत असे, अशा प्रकारे त्रास दिल्याचे कथन केले आहे. अर्जदार क्र.१ हिच्या कथनांप्रमाणे संरक्षण अधिकारी यांनी नि.क्र.२ वर तसा कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनेचा अहवाल देखील दाखल केला आहे. सामनेवाला क्र.१ याने जरी तो मुलींच्या नावे पोस्टात रक्कम जमा करत असल्याचे कथन करून तशा पावत्या कागदयादी नि.२३ अनु. १ व २ वर दाखल केल्या असल्या तरी त्याने अर्जदार क्र.१ ते ४ हे त्याच्यापासुन विभक्त राहत असलेल्या कालावधीत त्यांच्या पालणपोषणाकरिता किंवा मुलींच्या शैक्षणिक खर्चाकरिता त्यांना आर्थिक सहाय्य केल्याबाबतचा कोणताही पुरावा पटलावर दाखल केला नाही. तसे त्याचे कथन देखील नाही.

७. सामनेवालांतर्फे विधिज्ञ श्री. संगे यांनी अर्जदार क्र.१ हिने तिच्या अचल संपत्तीची माहिती मालमत्ता व दायित्व प्रकटीकरण शपथपत्रात लपवुन ठेवल्यामुळे तिच्या कथनांवर विसंबुन कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे अनुमान काढता येणार नाही असा युक्तिवाद केला आहे. निश्चितपणे अर्जदार क्र.१ हिने तिच्या नि.क्र.६ वरील मालमत्ता व दायित्व प्रकटीकरण शपथपत्रात सदर मिळकतीचा उल्लेख केला नाही, परंतु सद्यस्थितीत केवळ तेवढयाच कारणावरून ती सामनेवाला यांच्याविरूध्द खोटी विधाने करत आहे किंवा सामनेवाला यांनी तिच्यावर कोणताही कौटुंबिक हिंसाचार केला नाही असे अनुमान काढता येणार नाही. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ ही ऑगस्ट २०२३ पासून स्वतंत्र रहात असल्याचे मान्य केले आहे. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार यांना आर्थिक सहाय्य देण्याची त्याची ऐपत नसल्याचे कथन करुन त्यांच्या प्रती असलेली स्वत:ची जबाबदारी नाकारली आहे. केवळ मुलींच्या नावे पोस्टात पैसे भरतो तेवढयाच कारणावरून तो अर्जदार यांची संपुर्ण आर्थिक जबाबदारी घेत आहे असे म्हणता येणार नाही. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिचा पती म्हणुन तसेच अर्जदार क्र.२ ते ४ यांचा पिता म्हणुन त्यांचे भरणपोषण करण्यास कायदेशीर व नैतिकरित्या जबाबदार आहे. परंतु सदर विभक्त रहात असलेल्या कालावधीत त्याने अर्जदार यांची कोणतीही आर्थिक जबाबदारी न स्विकारुन त्यांचा आर्थिक छळच केला आहे. सामनेवाला क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री. संगे यांनी माननीय मुंबई उच्च न्यायालय यांच्या **कौशिक अनिल घरामी वि. संगिता कौशिक घरामी, फौजदारी याचिका क्र.३२/२०१४ दि.०५.०५.२०१४** रोजी निर्णित या प्रकरणातील गुणोत्तराचा आधार घेवून जोपर्यंत अर्जदार तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सिध्द करत नाही तोपर्यंत ती किंवा तिच्या मुली अधिनियमाच्या तरतुदीद्वारे कोणत्याही मागण्या मंजुर होवून मिळण्यास पात्र नाही असा युक्तिवाद केला आहे. परंतु अर्जदार विभक्त रहात असलेल्या कालावधीत त्यांना आर्थिक सहाय्य न देणे हे देखील कौटुंबिक हिंसाचाराच्या व्याख्येत समाविष्ट होणारे कृत्य म्हणजे आर्थिक छळ आहे. अशा प्रकारे

अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला क्र.१ याने तिचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी सिध्द केले आहे. परिणामी अर्जदार क्र.१ ही पिडिता म्हणून अधिनियम कलम २३ अन्वये तात्पुरते आदेश मिळण्यास पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करीता** :-

८. अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला क्र.१ याच्याकडून दरमहा र.रू. ३५,०००/- तात्पुरत्या पोटगी स्वरुपात मागितले आहेत. सामनेवाला क्र. १ याने तो कुवेत येथे नोकरी करत असल्याचे मान्य केले असले तरी अर्जदार क्र.१ हिने त्याचे निश्चित वेतन दाखविण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. सामनेवाला क्र.१ याने जरी तो वाहन चालक म्हणुन नोकरी करत असुन त्याला दरमहा र. रू. २७ ते २८ हजार पगार मिळत असल्याचे कथन केले असले तरी त्याने देखील तसे दर्शविण्यासाठी त्याची वेतन पत्रिका पटलावर दाखल केली नाही. सामनेवाला क्र.१ याने त्याच्या र.रू.१६,८०,०००/- बॅक कर्जाच्या पुष्टीकरिता कागदयादी नि.क्र.२५ सोबत कर्ज खाते उतारा मात्र दाखल केला आहे. सदर कर्ज खाते उता-याचे अवलोकन केले असता सामनेवाला क्र.१ याने १०,३९,९५८/- रूपयाचे कर्ज घेतल्याचे दिसत असून त्याला दरमहा र. रू. १९,३७६/- कर्ज हप्ता भरावा लागत असल्याचे दिसत आहे. सामनेवाला क्र.१ यास सदर मंजुर झालेल्या कर्जावरून व त्याच्या दरमहा कर्जाच्या हप्त्यावरून त्याचा दरमहा पगार रक्कम रूपये २७ ते २८ हजार असेल असे वाटत नाही. तेवढा पगार असता तर निश्चितच सामनेवाला क्र.१ याने त्याची वेतन पत्रिका पटलावर दाखल केली असती. परंतु त्याने तसे करण्याचे टाळल्यामुळे तो न्यायालयापासुन त्याची निश्चित कमाई लपवु पहात असल्याचे दिसत आहे. सद्यस्थितीत अर्जदार क्र.१ हिच्यावर तिच्यासह तिच्या तीन मुलींच्या पालणपोषणाची तसेच शिक्षणाची जबाबदारी असल्याचे नाकारता येणार नाही. अर्जदार क्र.१ हिचे स्वत:चे उत्पन्न असल्याबाबत सामनेवाला क्र.१ याचा

बचाव नाही. अर्जदार क्र.१ हिने तिला स्वत:ला थायरॉईडचा त्रास असल्याबाबत तसेच अर्जदार क्र.४ हिच्यावर देखील वैद्यकिय उपचार चालू असुन तिचा वैद्यकिय खर्च करावा लागत असल्याबाबत वैद्यकिय कागदपत्रे कागदयादी नि.क्र.२१ सोबत दाखल केले आहेत. अर्जदार क्र.१ ही प्रस्तुत अर्जात मागणी केल्याप्रमाणे संपुर्ण र. रू. ३५,०००/- मिळण्यास पात्र नसली किंवा त्या अनुषंगाने तिने निश्चित पुरावा दाखल केला नसला तरी तिच्यावर असलेली आर्थिक जबाबदारी, दोन्ही पक्षांचे अंदाजे राहणीमान तसेच सद्य स्थितीतील महागाई यांचा विचार करता अर्जदार क्र.१ ही स्वत:साठी दरमहा र.रू. ३०००/- व अर्जदार क्र.२ ते ४ करिता दरमहा प्रत्येकी र.रू.१०००/- अशी तात्पुरत्या स्वरुपात पोटगी मिळण्यास पात्र आहे.सबब मी मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशत: होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ३ करीता** :-

९. अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला यांच्याविरूध्द संरक्षण आदेशाची मागणी केली आहे. परंतु ती त्यांच्या पासुन विभक्त रहात असलेल्या कालावधीत त्यांनी ती रहात असलेल्या ठिकाणी येवुन तिला किंवा तिच्या मुलींना कोणत्याही प्रकारे त्रास दिल्याचे तिचे कथन नाही. त्यामुळे सद्य स्थितीत तिला संरक्षण आदेशाची गरज आहे असे वाटत नाही. अर्जदार क्र.१ हिने मुलींचा ताबा तिच्याकडे कायमस्वरूपी रहावा अशी देखील मागणी केली आहे. परंतु अधिनियमामध्ये मुलांच्या कायमस्वरूपी ताब्याविषयी कोणतीही तरतुद नसल्यामुळे अर्जदार क्र.१ हिची तशी मागणी मान्य करता येणार नाही. अर्जदार क्र.१ हिने तिच्या निवासाकरिता देखील दिलासा मिळण्याकरिता मागणी केली आहे. तिने तिच्या आईवडीलांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्यामुळे ती त्यांच्याकडे कायमस्वरूपी अवलंबून राहु शकत नाही असे तिचे म्हणणे आहे. अर्जदार क्र.१ हिस तात्पुरती पोटगी मंजुर केली आहे. त्यामुळे तिला काही प्रमाणात कोणावरही आर्थिकरित्या अवलंबून राहण्याची गरज नाही. तिच्या निवासाबाबत सद्यस्थितीत संपुर्ण पुराव्या खेरीज कोणताही

निर्णय घेणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे तिची तात्पुरत्या निवासी आदेशाची मागणी देखील मान्य करता येणार नाही. सबब मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ करीता** :-

१०. अशा प्रकारे मुद्दा क्र.१ च्या होकारार्थी व मुद्दा क्र.२ च्या अंशत: होकारार्थी निष्कर्षाच्या अनुषंगाने अर्जदार क्र.१ ही स्वत: करीता दरमहा र.रु. ३,०००/- व अर्जदार क्र.२ ते ४ करिता दरमहा प्रत्येकी र. रू. १०००/- अर्ज दाखल तारखेपासून तात्पुरत्या पोटगी स्वरुपात मिळण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्र.४ च्या उत्तरार्थ मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ अर्ज अंशत: मंजुर करण्यात येत आहे.

२ सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिस तिच्याकरिता दरमहा र रु. ३,०००/- व अर्जदार क्र.२ ते ४ करिता दरमहा प्रत्येकी र.रू. १०००/- प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन ते प्रस्तुत प्रकरण निकाली होईपर्यंत तात्पूरत्या पोटगी स्वरुपात द्यावेत.

३ अर्जदार क्र.१ हिच्या इतर मागण्या नामंजुर करण्यात येत आहेत.

४ सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना मोफत द्यावी.

SANDEEP VISHNU KHAIRE

Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2025.11.16 15:06:04 +0530

स्थळ : रोहा. (सं. वि. खैरे)
दि.१८.११.२०२५ न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

## प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की पी.डी.एफ.करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मुळ आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी व फौजदारी न्यायालय, रोहा. |
| लघुलेखक श्रेणी- ३ | : | श्री. अ. अ. नाखवा |
| आदेशाची तारीख | : | १८.११.२०२५ |
| आदेशावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १९.११.२०२५ |
| आदेश / न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | १९.११.२०२५ |